N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** कासा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0112 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/08/2025 16:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Date From (दिनांक पासून):** 19/08/2025
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/08/2025
   **Time From (वेळेपासून):** 13:15 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/08/2025 **Time (वेळ):** 15:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 010

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/08/2025 15:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** 00,सायवन रोड,ग्राम पंचायत सायवन , सायवन ,डहाणू

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गौरव शिवाजी भोरे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** शिवाजी भोरे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 02,लिलावती अपार्टमेंट,सावली बंगल्यासमोर,राजा डेअरी जवळ, फूलपाडा रोड,वसई,कासा,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 02,लिलावती अपार्टमेंट,सावली बंगल्यासमोर,राजा डेअरी जवळ, फूलपाडा रोड,वसई,कासा,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** व्यापारी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9820877969

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ममता मनोज पिंपळे | | पती का नाम : मनोज पिंपळे | 1. 303,बोईसर रोड, बिल्डींग नं 09 यशवंत श्रष्टी,, राहुल इंटरनशन शाळा जवळ बोईसर, पालघर,बोईसर,पालघर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | विष्णु जीवन बोरसा | | वडील का नाम : जीवन बोरसा | 1. 00,सायवन रोड, बाजारपाडा,, सायवन,डहाणु,कासा,पालघर, महाराष्ट्र,भारत-401607 |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | यशवंत किरण भोये | | वडील का नाम : किरण भोये | 1. 00,सायवन, रोड, पिंपळपाडा,, सायवन,,डहाणु,कासा,पालघर, महाराष्ट्र,भारत-401607 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11. Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांकः- 20/08/2025.

मी, गौरव शिवाजी भोरे वय - 34 राहणार- रुम नं. 02, लिलावती अपार्टमेंट, सावली बंगल्यासमोर, राजा डेअरी जवळ, फूलपाडा रोड, विरार (पुर्व) असा असुन समक्ष हजर राहुन फिर्याद लिहून देतो की,

मी वरील प्रमाणे असुन माझा विरार ते डहाणू परिसरातील स्थानिक शेतक-यांकडुन गवताच्या पेंढया ( ओल्या व सुक्या गवताच्या ) विकत घेवून तो माल त्याच परिसरातील गोठा, तबेले व इतर पेपर कंपन्यांना विक्री करायाचा व्यवसाय आहे. मला वापी येथील एका पेपर कंपनीत सुक्या गवताच्या पेंढया पुरवण्याचे काम मिळालेले आहे. परंतु सदर कपंनीने मला मी ज्या गावामधून हा व्यवसाय करत आहे त्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचे ना हरकत प्रमाणपत्र मागीतले आहे. म्हणुन मी ग्रुप ग्रामपंचायत सायवन, मु.पो. सायवन बाजारपाडा ता. डहाणू जि. पालघर येथे गेलो असता त्या ठिकाणाचे ग्रामसेविका श्रीमती ममता पिपंळे मॅडम यांनी मला त्यांचे ग्रामपंचायती अंतर्गत माझे व्यवसायासाठी लिव्ह अँण्ड लायसन्स कराराने जागा भाडयाने घेवून ग्रामपंचातीस अर्ज करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी रामपूर, वरठापाडा येथील माझ्या ओळखीचा संजय वरठा यांच्यासोबत जागेबाबत बोलणी करुन त्याचे वडील श्री. माहू शिडवा वरठा यांच्या मालकीची मौजे. व्याहाळी, गट क्र. 41/4 क्षेत्र 3.64.00 चौ.मि. रामपूर वरठा येथील 25 फुट बाय 150 फुट जागा भाडयाने घेण्याचे ठरवले. तसेच त्या जागेसंदर्भात दिनांक 25/07/2025 रोजी श्री. माहू वरठा यांचेसोबत स्टेम्प पेपरवर लिव्ह अँण्ड लायसन्स करार केला.

त्यांनतर दिनांक 28/07/2025 रोजी मी स्वतः सायवन ग्रुप ग्रामपंचायत मध्ये जावून ग्रामसेविका श्रीमती. ममता पिंपळे मॅडम यांची भेट घेवून त्यांचेकडे ग्रामसभेचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला. त्यांनतर दोन ते वेळा मी श्रीमती पिंपळे मॅडम यांची भेट घेतली परंतु त्यांनी मला ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत काही एक प्रतिसाद दिला नाही. दिनांक 06/08/2025 रोजी मी पिंपळे मॅडमची भेट घेतली असता त्यांनी मला दिनांक 11/08/2025 रोजी मासीक सभा आहे तेव्हा या असे सांगितले. मी दिनांक 11/08/2025 रोजी सायवन ग्रामपंचायत येथे गेलो असता त्या ठिकाणी मासिक सभा सुरु होती, सभा झालेनंतर मी मॅडमची भेट घेतली असता त्यांनी मला ग्रामसभेचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी रुपये 25,000/- दयावे लागेल असे सांगितले. त्यांनतर मी तेथील सरपंच श्री. विष्णु बोरसा यांची भेट घेतली असता त्यांनी ' मी मॅडमला सांगतो' असे म्हणुन त्यांनी मॅडमशी बोलणी करुन मला 15,000/- रुपये दे त्यांना असे सांगितले. मी मॅडमची भेट घेवून 5000/- रुपये देतो असे बोललो असता त्यांनी ठिक आहे, 15,000/- दे आणी हे घे प्रमाणपत्र म्हणून मला ग्रामपंचायत मासिक सभा दि. 11/08/2025 रोजीचा ठराव क्र. 79 अन्वये मंजुर ना हरकत दाखला दिला.

श्रीमती पिंपळे मॅडम यांनी मला दिलेला ना हरकत प्रमाणपत्र दाखला हा मासिक सभेचा असल्याने तो माझ्या काहीएक उपयोगाचा नव्हता. मला ग्रामसभेचा ना हरकत दाखला आवश्यक आहे म्हणुन मी मॅडमकडे ग्रामसभेचा ना



Scanned with OKEN Scanner

हरकत दाखला मिळणेबाबत विचारणा केला असता त्यांनी मला 15,000/- रुपये घेवून या मग मी देते असे सांगितले. तसेच दिनांक 13/08/2025 रोजी ग्रामसभा आहे ती संपल्यानंतर 3 वाजता भेटा असे बोलून मला जाण्यास सांगितले. माझे व्यवसाय करीता ग्रामसभेचा ना हरकत दाखला मिळविण्यासाठी कोणतीही शासकीय फि लागत नसल्याचे मला माहित आहे. माझे मॅडमसोबत कोणतेही आर्थिक व्यवहार व पुर्ववैमन्स्य नाही. तसेच मी घेतलेले कराराचे जागेची वार्षिक भाडेपटटी 3500/- रुपये असलेबाबत श्रीमती पिंपळे मॅडम यांनी मला सांगितले असुन ती मी वर्षाअखेर भरणा करणार आहे. म्हणुन श्रीमती पिंपळे मॅडम माझेकडे मागणी करत असलेले 15,000/- रुपये रक्कम लाचेची मागणी असल्याचे मला समजले आहे. मला श्रीमती पिंपळे मॅडम यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे कार्यालय, ठाणे येथे त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई होणेसाठी लेखी तक्रार देत आहे.'' वगैरे मजकुराची तक्रार मी दि. 13/08/2025 रोजी दिली आहे.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 13/08/2025 रोजी ठाणे अँन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस निरीक्षक श्री प्रमोद आहिरे यांनी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते एका कापडी पिशवीमध्ये ठेवुन सदर पिशवी सेप्टी पिनच्या सहाय्याने माझे शर्टाचे आतील बाजुस बनियानमध्ये लावुन दिला. त्यानंतर मी व पंच नं 01 श्री बागुल असे लोकसेविका पिंपळे यांचे कार्यालय ग्रामपंचायत सायवन या कार्यालयात जावुन लोकसेविका श्रीमती पिंपळे यांची भेट घेतली व त्यांना प्रथम त्यांचे झालेल्या ग्रामसभेबाबत विचारणा केली चर्चा केली व त्यांनतर मी श्रीमती पिंपळे यांना '' मग आता म्हणजे कसे ..... माझे काम झाले एकंदरीत हा....'' असे विचारले. त्यावेळी श्रीमती पिंपळे,ग्रासमविकास अधिकारी यांनी मला '' मी संजयला तेच विचारले ..... येणार आहेत का विचार, नाही तर मला सोमवार शिवाय मला टाईम नाही, तो बोलेला सोमवारीच येईल संध्याकाळी तुम्हाला फोन लावलेला त्यांनी '' असे मला सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' ह.... फोन लावला पण ते काय माहिती का ते रेंज नसते .... त्याला सांगीतल होतो मी रेडी करुन ठेव म्हणुन '' असे सांगीतले. त्यावर श्रीमती पिंपळे यांनी मला '' तो, तर मला बोलला नाही. '' असे सांगीतले. त्यानंतर मी श्रीमती पिंपळे यांना '' कंपनीत ग्रामसभेचे ना हरकत पत्र लागणार '' असे सांगीतले .त्यावर श्रीमती पिंपळे यांनी मला '' पेसा.......ग्रामपंचायत असेल ना पेसा.....त्याला पेसाची ग्रामपंयात मंजुरी मिळते '' असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' पेसा....म्हणजे काय... कस काय '' असे विचारले. त्यावेळी त्यांनी मला '' पेसा....म्हणजे आदिवासी क्षेत्र .... त्याला पेसाची ग्रामपंयात मंजुरी मिळते ..... ऑदर तुम्ही त्या डहाणुच्या किनारपट्टीला गेलात ना त्यांना ग्रामसभेची गरज नाही... त्यांना मासिक सभेचीच गरज आहे.....'' असे मला सांगीतले. त्यानंतर त्यांनी मला '' पण डहाणु कस आहे........ डहाणु तालुका पुर्ण पेसा मध्ये आहे...40 ग्रामपंचायती नॉन पेसा, बाकी पेसा मध्ये.'' असे सांगीतले. त्यावर मी त्यांना '' आपली ही पेसा मध्ये येते '' असे विचारले. त्यावेळी त्यांनी मला '' सर्व डहाणुचा म्हणजे तुम्ही जिकडे प्रोजेक्ट कराल ना तिथे ग्रामसभा घेणे आवश्यक आहे..... ग्रामसभेचा ठराव घेणे आवश्यकच आहे.... डहाणु तालुका डहाणु, वाडा,मोखाडा, जव्हार आणि विक्रमगड हे सर्व पेसा अंतर्गत '' असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना '' आता म्हणजे मला आता मासिक मला कंपनीमधुन काय इशु नाही काय कामाच नाही....तुम्हाला ग्रामसभेचीच काढायंच म्हणुन बोलले तेवढयावर काम अडलय....बाकी ते मॅडम, बोलले बाकी, '' असे विचारले. त्यावेळी श्रीमती पिंपळे यांनी मला '' बोलले तुम्ही चेक आणला असेल तर देवुन जा त्यांना...... ते चेक पास झाला की तुम्हाला पावती भेटणार..... अस काही नाही तुम्हाला मिळणार नाही.'' असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' आज रेडी आहे मॅडम एनओसी वगैरे..'' असे विचारले असता त्यांनी मला '' बघुया आता बघुया '' असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना '' आज लागल्या हाती भेटले तर म्हणजे कस ते....पुर्ण विषयच क्लिअर करुन टाकतो ना.....'' अशी विनंती केली. सदर वेळी श्रीमती पिंपळे व मी माझे कामा संदर्भात चर्चा करत असते वेळी लोकसेविका पिंपळे यांचे कक्षामध्ये ग्रामपंचायतीचे सरपंच आले. त्यावेळी मी त्यांना नमस्कार केला. सदर वेळी सरपंच व श्रीमती पिंपळे या त्यांचे इतर दुस-या कामाबाबत चर्चा करत होते. त्यांनतर मी '' म्हटल जरा कमी वगैरे करा....ह......'' असे सांगीतले असता, सरपंच यांनी मला '' तुमच्या समोरच झालेले आहे....'' असे सांगीतले. त्यांनतर लोकसेविका श्रीमती पिंपळे यांनी मला '' तरी नशीब ग्रामसभेत विषय नाही निघाला. असुन ....बाकी आहे आम्ही ते पटापट केले......का हो.....हा...नाही तर आम्ही सांगीतले असे मासिक सभेमध्ये असे असे झालेले आहे. तर अजुन डिमांड वाढली असती पण आम्ही तो विषयच काढला नाही....'' असे सांगीतले. त्यावेळी मी '' तेव्हा डिमांड लाख रुपयापर्यंत पोहचली असती'' असे विचारले. त्यावेळी श्रीमती पिंपळे यांनी मला '' ह...... म्हणजे ते कस आपला, ग्रामपंचायतीचा फायदा होत असेल तर आपण माघार का घ्यायची असे ते.....'' असे सांगुन दोन्ही हाताच्या बोटाचा सांकेतिक इशारा करुन दहा हजार रुपये मागणी केली. त्यावेळी मी त्यांना '' शेवटी मॅडम पाच हजार रुपये ठिक होते.....'' असे विचारले. त्यावेळी लोकसेविका श्रीमती पिंपळे यांनी मला '' करा हो...'' असे बोलुन लाचेची रक्कम देण्याकरीता सांगीतले. त्यानंतर लागलीच सरपंच यांनी मला '' संजयला त्या दिवशी आगोदरच बोललो होतो 10 हजार '' असे सांगीतले. त्यावेळी



Scanned with OKEN Scanner

मी त्यांना '' काय......10 हजार रुपये असुन आता काम वगैरे पण चालु करायचे आहे त्यात आता कार्यक्रमाला 10 हजार '' असे सांगुन विनंती केली परंतु त्यांनी मला दहा हजार रुपये भरावे लागतील असे सांगीतले. त्यानंतर मी श्रीमती पिंपळे मॅडम यांना '' मग आजच विषय होवुन जाणार न.....आज देवुन टाकणार मग...'' असे विचारले. त्यावेळी त्यांनी मला '' ह......'' असे बोलुन सहमती देवुन सांगीतले की, '' मी आता तयार करुन ठेवते यशवंत कडे देवुन ठेवेल माझी साहिन देवुन '' असे मला सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' अच्छा.....मग आता अन पैसे कोणाला देवु '' असे विचारले असता त्यांनी मला '' कॅश देणार आहे,.... त्याला दया ना, तो पावती फाडुन देईल तुम्हाला मग लगेच '' असे सांगीतले आहे. त्यावेळी मी त्यांना '' ठिक आहे......आहेत ना मॅडम तुम्ही ?...... अजुन अर्धा/एक पाउण तास'' असे विचारले तेव्हा श्रीमती पिंपळे यांनी मला त्या अर्धा तास असल्याच सांगीतले आहे. सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झाल्याचे निष्पन्न झाले.
त्यानुसार लोकसेविका श्रीमती पिंपळे यांनी तक्रारदार यांना त्या अर्धा/एक पाउण तास कार्यालयात असल्याने लागलीच सापळापुर्व व सापळा कारवाई करण्याचे योजीले. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री प्रमोद आहिरे यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने दोन्ही पंचासमक्ष कायदेशीर बाबींचा अवलंब करुन सापळापुर्व कारवाई करुन सापळा कारवाई करीता मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 20 चलनी नोटा अशा 10,000/- रु. लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावुन ती माझे नेसुस पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवुन दिल्यानंतर मी लोकसेविका श्रीमती पिंपळे यांचे कार्यालय सायवन ग्रामपंचायत कार्यालयाकडे पंच नं 01 यांचेसह गेलो सदर वेळी सापळा पथक माझे पाठोपाठ येवुन कार्यालयाचे आजुबाजुस माझे इशा-याची वाट पाहत थांबुन होते, परंतु ग्रामपंचायत कार्यालय हे कार्यालयीन वेळ झालेली असल्याने सायवन ग्रामपंचायत कार्यालय बंद झाले झाल्याने लोकसेविका पिंपळे अथवा सदर कार्यालयातील इतर लोकसेवक कोणीही मला भेटलेले नाहीत. त्यानुसार मी परत सापळा पथका जवळ आलो तसा सविस्तर पडताळणी, सापळा परतीचा पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर नमुद लोकसेविका श्रीमती पिंपळे यांनी त्या दि. 14/08/2025 रोजी ग्रामपंचायत कार्यालयात येणार नसल्याचे सांगीतले होते. तसेच दि. 15/08/2025 ते दि. 17/08/2025 रोजी पावेतो शासकीय कार्यालयास सार्वजनीक व साप्ताहीक सुट्टी असल्याने लोकसेविका यांची भेट होणार नाही करीता दि. 18/08/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री प्रमोद आहिरे यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने दोन्ही पंचासमक्ष कायदेशीर बाबींचा अवलंब करुन सापळापुर्व कारवाई करुन सापळा कारवाई करीता मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 20 चलनी नोटा अशा10,000/- रु. लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावुन ती माझे नेसुस पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवुन दिल्यानंतर मी लोकसेविका श्रीमती पिंपळे यांचे कार्यालय सायवन ग्रामपंचायत कार्यालयाकडे पंच नं 01 यांचेसह गेलो सदर वेळी इतर लोकसेवक श्री विष्णु बोरसा, सरपंच हे मला ग्रामपंचायतीचे बाहेरील रोडवर भेटले
PTO त्यावेळी त्यांनी मला त्यांचे कारमध्ये बसण्याबाबत सांगीतले तसा मी सरपंच यांचे कारमध्ये बसलो. सदर वेळी मी त्यांना माझे स्थानिक शेतक-यांकडुन गवताच्या पेंढया (ओल्या व सुक्या गवताच्या) विकत घेवून तो माल त्याच परिसरातील गोठा, तबेले व इतर पेपर कंपन्यांना विक्री करायच्या व्यवसायाकरीता ग्रुप ग्रामपंचायत सायवन यांचेकडुन ग्रामसभेचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत विचापुस करीत असताना मी त्यांना '' अजुन नाही झाला...'' असे बोललो असता त्यांनी मला ''झाला ना... सहया करुन ठेवलेल्या कधीच... त्या दिवशीच संध्याकाळी केलेले'' असे सांगितले. त्यावर मी त्यांना '' त्याच दिवशी केल्या...'' असे विचारणा केली असता त्यांनी मला '' हा'' असे उत्तर दिले. त्यानंतर मी त्यांना '' अच्छा.. वाह....आता तेच होतं....आपलं थोडं काम पण होतं'' असे बोललो असता त्यांनी मला '' त्याच्याकडे दिलेलं आपण आता तर बंद आहे शिपायाकडे देवुन ठेवलेलं'' असे सांगुन '' आता बंद आहे'' असे सांगितले. मी सरपंच श्री.बोरसा यांना माझे ना हरकत प्रमाणपत्र घेणेसंदर्भात ''याचं...हं हं'' असे विचारले असता त्यांनी मला '' त्याचं काय... दहा सांगितलेलं ना तुम्हाला'' असे बोलले. त्यावर मी त्यांना '' दहा हजार रुपये...... त्याच्यामध्ये घरपट्टी वगैरे सगळं येणार काय?'' असे विचारले असता त्यांनी मला '' नाही घरपट्टीचं नंतर तुम्हाला करावं लागेल...करावं लागेल'' असे सांगितले. मी सरपंच श्री.बोरसा यांचेकडे ग्रामविकास अधिकारी श्रीमती पिंपळे यांचेबद्दल '' मॅडम आलेल्या ?'' असे विचारले असता त्यांनी मला '' नाही नाही..'' असे उत्तर दिले. त्यानंतर मी त्यांना '' तुम्ही किती वाजता असता सकाळी'' असे विचारले असता त्यांनी मला '' सकाळी दहा साडे दहा'' असे सांगुन '' मॅडम....उद्या येईल उद्या साधारण अकरा'' असे सांगितले. दरम्यान माझे सरपंच श्री.बोरसा यांचे सोबत पुढील संभाषण चालू असताना मी त्यांना ''झालं म्हणजे एनओसीचं काम झालं बाबा आपलं... हा... आता दहा हजार रुपये म्हणजे कसं तुम्हाला की मॅडमला?'' असे विचारणा केली असता त्यांनी मला '' नाय काय म्हणजे सगळं सगळं सगळयांनाच'' असे सांगितले. त्यावर स्पष्टता येण्यासाठी मी त्यांना '' का का कुणाला तुम्हाला देवु?'' असे बोललो असता त्यांनी '' नाही उद्या या उद्याच द्या ना'' असे सांगितले. त्यानंतर मी सरपंच श्री.बोरसा



Scanned with OKEN Scanner

यांना " आता एक काम करतो. तुमच्याकडे देवून टाकतो" असे बोललो असता त्यांनी मला " नाही. सकाळी... " असे बोलले. आमचेतील संभाषणा दरम्यान मी सरपंच श्री.बोरसा यांना " आता कसं आहे दहा हजार रुपये तुम्हाला देतो आणि... एकदा जरा मॅडमशी बोललं तर बरं होईल" असे बोललो असता त्यांनी मला " नाही काही नाही बोलणार. कसं आहे त्यांनी तर सहया करुन ठेवलेलं आहे ना" असे सांगितले. मी त्यांना " त्यांनी सहया करुन ठेवलेल्या आहेत.... ते मॅडम आणि तुम्ही ते बघुन घ्या काय आहे ते..." असे बोललो असता त्यांनी मला " नाही सदस्यांना काय जेवण वगैरे काय पन्नास एक असेल ते मागणीनुसार. त्यांनी तर वीस सांगितलेलं" असे सांगितले. त्यावर मी त्यांना " वीस हजार रुपये" असे विचारले असता त्यांनी मला " नाही वीसच सांगितलेलं.... त्या दिवशी तुम्हाला सांगितलेलं बघा " असे सांगुन " सदस्याने वीस सांगितलंय... नाही तर मी कमी केलेत मग ...... आपलं संजय वगैरे चांगले संबंध आहे." असे सांगीतले. मी सरपंच श्री. बोरसा यांना " हे दहा हजार रुपये तुमच्याकडे देतो" असे बोललो असता ते मला " नाही. आता नको. उद्या द्या. उद्या द्या" असे बोलून " त्यांच्याकडे दिले माझ्याकडे दिले तरी पण सांगता येईल असं " असे सांगीतले. त्यानंतर सरपंच श्री. बोरसा हे मला " ऑफीसर... नाही तर कागद.. एका हातात कागद आहे " असे बोलले असता मी त्यांना " एक हातात कागद एका हातात पैसे. वाव छान छान." असे बोलून मी उदया येतो असे सांगुन सदर ठिकाणावरुन निघुन परत आलो असता, तसा सविस्तर सापळापुर्व व सापळा परतीचा पंचनामा करण्यात आलेला आहे.

दि. 19/08/2025 रोजी इतर लोकसेवक श्री बोरसा, सरपंच यांनी मला पैसे घेवुन बोलविले नुसार पोलीस निरीक्षक श्री प्रमोद आहिरे, ऐसीबी ठाणे यांनी दि. 19/08/2025 रोजी सापळा कारवाईच्या अनुषंगाने दोन्ही पंचासमक्ष कायदेशीर बाबींचा अवलंब करुन सापळापुर्व कारवाई करुन माझेकडे अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आलेली लाचेची रक्कम देवुन तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन दिल्यांनतर मी पंच नं 01 श्री बागुल यांचेसह लोकसेविका यांचे कार्यालय ग्रामपंचायत सायवन कार्यालयात येवुन लोकसेविका श्रीमती पिंपळे यांचे सांगणेप्रमाणे माझे ना हारकत प्रमाणपत्र तयार आहे का ? याबाबत खात्री करण्याकरीता ग्रामपंचायतीचे कार्यालयातील लिपीक श्री यशवंत भोये यांची भेट घेतली असता, त्यांनी माझे तयार असलेले ना हरकत प्रमाणपत्राची एक प्रत माझेकडे देवून "याच्यावर एक पोहच द्या.." असे बोलून त्या प्रतीवर डाव्या बाजुस स्वाक्षरी करण्यास सांगितले व " पावतीचं बोलल ना मॅडम..... बोलणं झालं ना पावतीचं" असे विचारले. त्यावेळी मी त्यास " काही नाही मॅडमशी भेटतो ना आता" असे बोललो. त्यानंतर मी लोकसेविका श्रीमती ममता पिंपळे यांना त्यांचे कार्यालयात समक्ष भेटलो. त्यावेळी सरपंच श्री. बोरसा हे सुध्दा त्यांचेसोबत कार्यालयात उपस्थित होते. मी, माझे स्थानिक शेतक-यांकडुन गवताच्या पेंढया ( ओल्या व सुक्या गवताच्या ) विकत घेवून तो माल त्याच परिसरातील गोठा, तबेले व इतर पेपर कंपन्यांना विक्री करावयाच्या व्यवसायाबद्दल मला येणा-या अडचणींबाबत त्यांचेशी संभाषण केले. संभाषणा दरम्यान लोकसेविका श्रीमती पिंपळे यांनी " ते दाखला दिला होता ना......दाखव " असे बोलून त्यानंतर काही संभाषण झाल्यावर त्यांनी " तुम्ही कॅश देणार आहेत?" असे विचारले असता मी त्यांना " कॅश...." असे उत्तर दिले. त्यावर त्यांनी मला " पावती घ्या 7 नंबरची" असे सांगितले. त्याबाबत मी त्यांना " ती कसली पावती असते?" असे विचारले असता त्यांनी " सामान्य पावती तुम्ही आमच्याकडे देणगी स्वरुपात रक्कम अदा केली. ते आम्ही फंडात जमा करणार ती पावती तुम्हाला देणार" असे उत्तर दिले. त्यानंतर मी त्यांना " हा........आता तुमच्या हातानेच होवु दे.......हा.......काय करु अ....." असे बोललो असता त्यांनी " थांबा पावती फाडू द्या" असे सांगितले. त्यावेळी लोकसेविका पिंपळे यांनी लिपीक यांना माझेकडुन पैसे घेवुन पावती देण्याबाबत सांगीतले, त्यानुसार लिपीक भोये यांनी माझे नावे 18 हजार रुपयांची पावती घेवुन आले असता, तक्रारदार यांनी सरपंच यांना दहा हजार बोललेत ना असे विचारले त्यावेळी सरपंच व लोकसेविका पिंपळे यामध्ये सरपंच श्री. बोरसा यांनी "दहा" असे बोलले असता श्रीमती पिंपळे यांनी " दहा.... दहा हजार रुपये दिले " असे सांगितले. त्यावर सरपंच श्री. बोरसा यांनी "किती दिले" असे विचारल्यावर श्रीमती पिंपळे यांनी " दहा दिले." असे सांगितले. त्यावेळी सरपंच श्री.बोरसा यांनी " नाही नाही त्यांना 20 पर्यत सांगितले ना" असे बोलल्यावर श्रीमती पिंपळे यांनी "20 दिले 20 सांगितले ना" असे बोलल्या. त्यावर मी त्यांना " वीस..... नाय....हं" असे बोललो. त्यानंतर सरपंच श्री.बोरसा यांनी " त्याने दहा वर " असे बोलल्यावर श्रीमती पिंपळे यांनी " त्याने 20 पुर्ण केले असे मला वाटले." असे बोलल्या. त्यामुळे मी त्यांना " ठीक आहे... करु आता काम झालं तर.. थांबा मग एक नंतर बनवु..आता एक करतो.. हा ... बाकी नेक्स्ट टाईम..... आता " असे बोलून " ओके .....ह......आता सध्या एवढ करतो एवढ करतो ह ओके ....ह...." अ से बोललो. त्यानंतर मी व पंच असे लिपीक भोये यांचेसोबत त्यांचे कक्षात येवुन मी त्यांचेकडील लाचेची रक्कम माझे खिश्यातुन बाहेर काढुन लिपीक भोये यांना दिली ती रक्कम लिपीक भोये यांनी स्वीकारुन स्वतःच्या शर्टच्या खिश्यामध्ये ठेवुन दिली. त्यांनतर त्यांनी मला दहा हजारची प्रमाणित नसलेली त्यांच्या सहिने देणगी पावती दिली. त्यानुसार मी कार्यालयाचे बाहेरील बाजुस येवुन पुर्वनियोजीत इशारा केला असता,



Scanned with OKEN Scanner

सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी इतर लोकसेवक श्री भोये कंत्राटी लिपीक यांना 13.15 वा. लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे. सदर सापळा कारवाईचे घटनास्थळी लिपीक यशवंत भोये यांचे नेसुस शर्टचे वरील खिश्यातून 10,000/-रु रोख रक्कम मिळुन आली असुन सदरची रोख रक्कम सापळा पथकाने जप्त केली आहे.

अशा प्रकारे लोकसेविका श्रीमती ममता मनोज पिंपळे, वय -42 वर्षे, ग्राम विकास अधिकारी, (ग्रामसेविका), ग्रामपंचायत सायवन ता. डहाणू, जि. पालघर (वर्ग 3) रा. प्लॅट नं 303, बिल्डींग नं 09, यशवंत श्रृष्टी, राहुल इंटरनॅशनल शाळा जवळ, बोईसर, ता. डहाणु जि. पालघर व इतर लोकसेवक श्री विष्णु जीवन बोरसा, वय - 48 वर्षे सरपंच ग्रामपंचायत सायवन ता. डहाणू, जि. पालघर रा. मु. पो. सायवन, बाजारपाडा, ता. डहाणु जि. पालघर यांनी माझा स्थानिक शेतक-यांकडुन गवताच्या पेंढया ( ओल्या व सुक्या गवताच्या )विकत घेवून तो माल त्याच परिसरातील गोठा, तबेले व इतर पेपर कंपन्यांना विक्री करायाचा व्यवसाय असुन, सदर व्यवसाय करण्याकरीता ग्रुप ग्रामपंचायत सायवन यांचेकडुन ग्रामसभेचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता माझ्याकडे 10,000/- रु.ची लाचेची मागणी करुन दिनांक 19/08/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम लोकसेविका पिंपळे, ग्रामसेविका व इतर लोकसेवक बोरसा, सरपंच यांचे सांगणेवरुन इतर लोकसेवक श्री यशवंत किरण भोये, वय - 35, कंत्राटी ग्रामपंचायत लिपीक, रा. सायवन, पिंपळपाडा, ता. डहाणु, जि. पालघर यांनी माझेकडून स्विकारली असता लिपीक यशवंत किरण भोये यास सापळा पथकाने लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली असता ती मी माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

avinash balkrushna mandle(I (Inspector)) / Pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer In charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

पोलीस हवालदार
फलटण पोलीस स्टेशन

**Name (नाव):** avinash balkrushna
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** Pi



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | बाहरी शीर्ष: सलवार टॉप |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner